**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग**
केंद्र क्र. १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र,
कफ परेड, कुलाबा, मुंबई-४०० ००५
दूरध्वनीः ०२२-२२१६ ३९६४/६५/६९ फॅक्सः ०२२-२२१६ ३९७६

ई-मेल: mercindia@merc.gov.in वेब-साईट
www.mercindia.org.in/www.merc.gov.in

## जाहीर सूचना

### सन २०१४ चे प्रकरण क्र. ६७

**दिनांकः १ जुलै, २०१४**

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने मे. अमरावती पॉवर ट्रान्समिशन कंपनी लि. यांना मंजूर केलेल्या पारेषण परवाना क्र. सन २०१० च्या ३ मध्ये सुधारणा करण्यासाठी त्यांनी दाखल केलेला अर्ज**

मे. अमरावती पॉवर ट्रान्समिशन कंपनी लि. ( ए पी टी सी एल) इंडियाबुल्स हाऊस, ४४८-४५१, उद्योग विहार, फेज-५, गुरगांव, हरयाणा- १२२ ००१ यांनी विद्युत अधिनियम २००३ च्या कलम १८ अंतर्गत ‘‘मे. अमरावती पॉवर ट्रान्समिशन कंपनी लि. च्या पारेषण परवाना (परवाना क्र. सन २०१० चा ३) मध्ये काही सुधारणा करण्यासाठी आयोगाकडे अर्ज दाखल केला आहे.

अर्जदाराने विद्युत अधिनियम २००३ च्या कलम १८(२)(ए)मधील आवश्यकतेनुसार, त्यांच्या अर्जाबाबत नोटीस, (१) दि टाइम्स ऑफ इंडिया, नागपूर (इंग्रजी); (२) हितवाडा, नागपूर (इंग्रजी);(३) मातृभूमी (मराठी); आणि (४) हिंदुस्तान, अमरावती (मराठी) मध्ये दिनांक ८ मे, २०१४ रोजी प्रसिध्द केली आहे.

वरीलप्रमाणे नोटीस प्रसिध्द करण्यात आल्यानंतर, पारेषण परवाना सुधारणा याचिकेसंबंधात कोणतीही हरकत प्राप्त झालेली नाही.

या संदर्भात उपलब्ध माहिती विचारात घेतल्यानंतर आयोगाची सकृतदर्शनी खात्री झाली आहे की, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (पारेषण परवाना अटी) विनियम, २००४ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (पारेषण परवाना अटी) विनियम, २००६ ने केलेल्या सुधारणांना अनुसरुन, ए पी टी सी एल यांना दिलेल्या परवाना क्र. सन २०१० चा ३ मध्ये, खालील पारेषण वाहिन्या संबंधित पायाभूत सोयींसह विकसित व प्रचलन करण्यासाठी, खाली दाखविन्यानुसार फक्त व्याप्तीमध्ये फेरबदल करुन सुधारणा करण्याची आवश्यकता आहेः-

| पारेषणाचे विद्यमान क्षेत्र | पारेषणाचे नियोजित सुधारित क्षेत्र |
|---|---|
| **(a) 400 KV D/C Quad Moose Amravati TPP-Akola S/S Transmission Line (104 km) (Line to be taken and connected to Akola-I substation of MSETCL initially and subsequently extended and connected to Akola-II substation of MEGPTCL)**<br>(b) LILO of 400 KV S/C Akola to Koradi Transmission line at Amravati TPP (7km)<br>(c) 2 Nos. 400 KV line bays at MSETCL Akola-I Sub-station | **(a) 400 KV D/C Quad Moose Amravati TPP-Akola-II S/S Transmission Line (104 km)**<br>(b) LILO of 400 KV S/C Akola to Koradi Transmission line at Amravati TPP (7km)<br>(c) 2 Nos. 400 KV line bays at MSETCL Akola-I Sub-station |

ए पी टी सी एल ने दाखल केलेल्या याचिकेच्या संदर्भात ज्या व्यक्तीस आपले म्हणणे आयोगासमोर व्यक्तीशः मांडावयाची इच्छा असेल अशा व्यक्तीने आयोगाच्या १३ वा मजला, **केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई-४०० ००५ येथील कार्यालयात दि. २२ जुलै, २०१४ रोजी स्काळी ११.३०** वाजता कृपया उपस्थित रहावे, जेव्हा ए पी टी सी एल ने पारेषण परवान्यामध्ये सुधारणा करण्य्साठी केलेल्या अर्जावर विचार करण्यात येणार आहे.

ए पी टी सी एल ने आयोगाला सादर केलेल्या अर्जाची प्रत त्यासोबतच्या जोडपत्रांसह आयोगाच्या www.mercindia.org.in/www.merc.gov.in या संकेत-स्थळांवर किंवा कोणत्याही व्यक्तीला या संबधातील कार्यपध्दतीचे पालन करुन आयोगाच्या कार्यालयात पाहता येईल.

स्वाक्षरी /-

सचिव, मविनिआ

ठिकाण : मुंबई

दिनांक : १ जुलै, २०१४